अधिसुचना

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ (१)**

जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
क्रं.२०२१/भूसंपादन/कार्या-१/एसआर१३/१९/आर आर/१८०३
दि. ३१/५/०४/२०२१

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या सोलापूर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, सोलापूर (जिल्हयाच्या) जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीअन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **ज्योती कदम, उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डूवाडी** यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नाव : पुनवर तालुका :- करमाळा जि.सोलापूर

| अ.क्र | गट नं. | क्षेत्र (हे- आर) | अ.क्र | गट नं. | क्षेत्र (हे- आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८९ पैकी | ०.३९ | २ | १९७ पैकी | ०.१७ |
| ३ | १९८ पैकी | ०.६० | ४ | १८५ पैकी | ०.०८ |
| ५ | १८४ पैकी | ०.१८ | ६ | १८० पैकी | ०.३२ |
| ७ | १७९ पैकी | ०.५८ | ८ | १७८ अ | ०.६८ |
| ९ | २१९ पैकी | ०.०४ | | **एकुण** | **३.०४** |

## अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :-** कुकडी डावा कालवा कर्जत शाखा कालवा चारी क्रं. १२ व तिची उपचारी क्र.१ चारी क्र. १३ व १४ करिता मौजे पुनवर ता.करमाळा जि.सोलापूर

**प्रकल्पाचे विवरण :-** कुकडी डावा कालवा कर्जत शाखा कालवा चारी क्रं. १२ व तिची उपचारी क्र.१ चारी क्र. १३ व १४ करिता मौजे पुनवर ता.करमाळा जि.सोलापूर

**सामाजिक फायदे :-** जलसिंचन

(सामाजिक, आर्थिक व इतर फायदे)

## अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गावाचे नाव :- पुनवर तालुका :- करमाळा जि.सोलापूर

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

पुनर्वसाहत करण्याची आवश्यकता नाही, सबब माहिती निरंक.

## अनुसूची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश )

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश) दि.१३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकीर्ण ०१/२०१५/प्र.क्र.३/अ-२ नुसार उक्त नियमाचे कलम १० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आली आहे.

टिप : उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डूवाडी यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक : ३१/५/०४/२०२१

ठिकाण : सोलापूर

(मिलींद शंभरकर)

**जिल्हाधिकारी सोलापूर**